नियमीत दिवाणी दावा क्र.०७/२०१९
अनुसया वि. शासन व इतर
वादीतर्फे सा.क्र.६
(नि.क्र.९४)



## उलटततपास प्रतिवादी क्र.५ तर्फे श्री.डी.एल.घोगरे वकील यांच्यामार्फत सुरु.

**१०.** अनुसयाबाई आणि जनाबाई यांच्यामध्ये एकुण किती न्यायालयीन प्रकरणे चालू आहेत, याबद्दल या दाव्या व्यतिरीक्त मला माहिती नाही. सदरचा दावा जमीन आणि पेन्शनबाबत आहे. जमीन आणि पेन्शनबद्दल वाद असल्याचे मला दोन्ही पक्षाने सांगितले. दि.२४/११/२०२१ रोजी सदर बाब त्यांनी मला औरंगाबाद येथे सांगितली. त्यापुर्वी मला त्याबद्दल काही माहिती नव्हते. मोरेवाडीतील मौघे गुरुजी आणि मला सदर वाद मिटवा असे सांगितले. मोघे सरांचे पुर्ण नाव मला माहिती नाही. मोघे सर माझ्यापुर्वी औरंगाबादला गेले होते. जनाबाई व तिच्या मुलाने मला भाडयाच्या गाडीने तेथे नेले. अनुसयाबाईच्या घरी बैठक झाली. जनाबाई, बाजीराव पाटील, मदन, मंगेश, मनोज, अनुसयाबाई असे बैठकीला हजर होते. बैठक अनुसयाबाईच्या मालकीच्या घरात झाली. दि.२४/११/२०२१ रोजी बैठक झाली. दि.२४/११/२०२१ रोजी सकाळी मी औरंगाबादला पोहचलो. दोन-तीन तास तेथे आमची चर्चा झाली. मदनने त्यावेळी स्टॅम्प पेपर आणला होता. तो स्टॅम्प पेपर त्याने औरंगाबादमध्येच खरेदी केला होता. मदन जनाबाईचा मुलगा आहे. बोलणी सुरु असताना तेथे स्टॅम्प पेपर आणले नव्हते. मनोज किंवा मंगेश यांनी स्टॅम्प पेपर आणले नव्हते. नोटरी वकिलांच्या घरी दि.२४/११/२०२१ रोजी स्टॅम्प लिहिण्यात आला. स्टॅम्पमधील

मजकुर आम्हाला वाचून दाखविण्यात आला आणि सहया करायला सांगितले. मदन आणि मनोज यांनी आम्हाला सहया करायला सांगितले. त्यानंतर त्याच दिवशी सदर स्टॅम्प नोटरी करण्यात आला. त्यानंतर मी दि.२५/११/२०२१ रोजी औरंगाबादवरुन पुन्हा गावाकडे येण्यासाठी सकाळी १०.०० वाजता मी एकटाच निघालो. संध्याकाळी ४.०० ते ५.०० वाजण्याच्या दरम्यान मी पोहचलो. जनाबाई वगैरे त्यांच्या गावाकडे निघून गेल्या. मला मराठी भाषा लिहिता-वाचता येते. आता मला नि.क्र.९९ हा दस्त दाखवला. त्यावर दि.२५/११/२०२१ अशी नोटराईज तारीख आहे. या दस्तावर बाजीराव व मदन यांच्या नावांपुढे दि.२४/११/२०२१ अशी तारीख आहे. त्या दस्तावर प्रत्येकांने एक-एक सही केली. एका सही व्यतिरीक्त त्यावर माझयासमोर अन्य सहया झालेल्या नाहीत. या दस्ताला एकुण किती पाने आहेत हे मला माहिती नाही. दस्तातील मजकूर मदन आणि मनोज यांनी सांगितला. मनोज हे वकील आहेत. ते औरंगाबाद येथे वकिली करतात. कधीपासून ते वकिली करतात हे मला माहिती नाही.

**११.** एक स्टम्प पेपर मनोज व दुसरा मदनने आणला होता. मनोजने दि.२४/११/२०२१ रोजी स्टॅम्प पेपर आणला होता. तो स्टॅम्प पेपर औरंगाबाद येथील नोटरी कार्यालयामधून खरेदी केला होता. तो स्टॅम्प पेपर दि.२४/११/२०२१ रोजी दुपारी २.०० ते ३.०० या

वेळेत लिहिला. तो स्टॅम्प पेपर दि.२४/११/२०२१ रोजी नोटरी झाला नाही. तो स्टॅम्प पेपर एका वकिलांनी लिहिला, त्यांचे नाव मला माहिती नाही. मनोजच्या स्टॅम्प पेपरमध्ये त्यांचे आपसात मिटले असल्याचा मजकूर लिहिला आहे. मदनच्या स्टॅम्प पेपरमध्ये ही त्यांचे आपसात मिटले आहे, असा मजकूर लिहिला आहे. त्या व्यतिरीक्त दुसरा मजकुर लिहिलेला नाही. दोन्ही पक्षकारांकडे ७/१२ उतारे होते, ते मी स्वत: बघितले होते. दस्ताला ७/१२ उतारे जोडलेले नाहीत. दि.न्या.क.स्तर, अहमदपूर येथे रे.दि.मु.क्र.७३/२०१९, ७/२०१९ चालू असल्याबद्दल मला माहिती नाही. मोरेवाडी येथील जमिनी मला माहिती आहेत. त्या जनाबाईच्या नावे होत्या. त्या खरेदीच्या होत्या. ती मुळ जमीन कोणाची होती हे मला माहिती नाही. कोर्टापुढे जनाबाई हिने अनुसयाबाई ही मोहनरावची पहिली पत्नी आहे असा मजकूर सांगितला आहे किंवा कसे याबद्दल मला माहिती नाही. न्यायालयात दावा चालू असताना न्यायालयाबाहेर तडजोड का केली हे मला माहिती नाही, ते त्यांना माहिती असावे.

**१२.** या प्रकरणात मोहनरावची पेन्शन जनाबाईला मिळते, याची मला माहिती नाही. खरबवाडी आणि मोरेवाडी येथील जमिनी जनाबाई करते, हे खरे नाही. हे खरे की, जमिनी आणि पेन्शनबद्दल जनाबाई आणि अनुसयाबाई यांच्यात ब-याच वर्षापासून वाद सुरु आहे. हे खरे की, या दोघींमध्ये न्यायालयीन प्रकरणे सुरु आहेत.

दि.२३/११/२०२१ रोजी मनोज जगताप खरबवाडी येथे आले होते, हे खरे नाही. दि.२३/११/२०२१ रोजी माझे आणि मनोज यांचे बोलणे झाले होते, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, दि.२३/११/२०२१ रोजी मी जनाबाईच्या घरी खरबवाडी येथे गेलो. दि.२३/११/२०२१ रोजी जनाबाईचा मुलगा बाजीराव पाटील मला बोलावायला आला होता, म्हणून मी तिच्या घरी गेलो. बाजीराव शाळेमध्ये नोकरीला आहे. हे खरे नाही की,दि.२३/११/२०२१ रोजी मी स्वत:हून तिच्या घरी गेलो होतो. संध्याकाळी ७.०० ते ७.३० च्या दरम्यान मी तिच्या घरी गेलो. हे खरे आहे की, त्यांच्या घरी माझे व त्यांचे बोलणे झाले. मी त्यांना, ''मनोज जगताप हे गावी आले आहेत आणि त्याने मला सांगितले की, त्याला व त्याच्या भावडांना आणि आईला वाद नको आहे व ते वाद मिटवायला तयार आहेत व त्यासाठी मला व माझया मुलाला औरंगाबाद येथे जावे लागेल'' असे सांगितले, हे म्हणणे खरे नाही. हे खरे की, मनोज, त्याचे भाऊ आणि आई औरंगाबाद येथे स्थाईक आहेत. हे खरे की, मुलाला विचारुन मिटवायचे किंवा नाही व औरंगाबादला जायचे की नाही हे सांगते असे जनाबाईने मला सांगितले. हे खरे नाही की, मुलांना आजच निरोप द्या असे मी जनाबाईला म्हणालो. हे खरे नाही की, मनोज आला असल्याने आपण औरंगाबादला जाऊ असे मी म्हणालो. हे खरे नाही की, दि.२३/११/२०२१ रोजीच मी मनोजला जनाबाईच्या घरी बोलावून घेतले. तिथे आमच्यात चर्चा झाली, आम्हाला काही नको,

भांडण मिटवायचे आहे असे आमिष तिला दाखविले. हे खरे की, दि.२३/११/२०२१ रोजी मदन अहमदपूर येथे हजर नव्हता. जनाबाईने मदनला फोन करुन औरंगाबादला ये असे सांगितले, हे खरे आहे. हे खरे की, दि.२३/११/२०२१ रोजी मदन मुंबईत होता. हे खरे की, जनाबाईचा फोन मदनला गेल्यावर त्याने दि.२४/११/२०२१ रोजी औरंगाबाद गाठले. मनोजकडे वाहन असल्याचे मला माहिती नाही. दि.२४/११/२०२१ रोजी सकाळी मनोजच्या वाहनात मनोज आम्हाला म्हणजे मी, जनाबाई, बाजीराव यांना घेवून गेला यास माझे सांगणे की, ते वाहन भाडयाने होते. हे खरे आहे की, दि.२४/११/२०२१ रोजी मी औरंगाबाद येथे मनोजच्या घरी सकाळी पोहचलो. मी सांगतो की, मी दुपारी पोहचलो. हे खरे की, त्या दरम्यान मदन मुंबईवरुन आला होता. हे खरे की, तिथे गेल्यावर आपसात आमची बोलणी झाली. अनुसया, मनोज आणि मंगेश यांनी आम्हाला जमीन द्या असे म्हणाले, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, जनाबाई हिने आम्हाला काही नको असे तुम्ही म्हणालात आणि आता जमीन द्या असे का म्हणता असे म्हणाली. त्यावर अनुसया, मनोज आणि मंगेश यांनी तुम्हाला तडजोडीमध्ये दोन एकर जमीन द्यावी लागते अशी मागणी केली, हे खरे नाही. मी सांगतो की, निम्म्या हिस्स्याची मागणी होती. हे खरे नाही की, जनाबाई व तिच्या मुलांनी अनुसयाबाईला दोन एकर जमीन गट क्र.३३ मधील देण्याचे मान्य केले. हे खरे नाही की, असेच ठरले

होते. दोघींना अर्धे-अर्धे द्यायचे असे ठरले व अर्ध्या-अर्ध्या जमिनीतील दोन एकर जमीन जनाबाईला आगाऊ द्यायची असे ठरले असे माझे म्हणणे आहे. हे खरे की, या चर्चेला बराच वेळ लागला. हे खरे की, मदन याला मुंबईला त्या दिवशी परत जायचे होते. हे खरे की, न्यायालयात जावून तडजोड करु असे जनाबाई आणि तिची मुले म्हणाली. हे खरे नाही की, दि.२४/११/२०२१ रोजी मदन मुंबईला परतला. हे खरे नाही की, अनुसयाबाईच्या मुलाने लिखाण करण्याची गडबड केली व कोर्टात तडजोड करण्यापेक्षा काही कागद तयार करु असे ते म्हणाले. हे खरे की, बोलाचाली होईपर्यंत दि.२४/११/२०२१ रोजी संध्याकाळ झाली होती. हे खरे नाही की, मनोजने एकटयानेच १०० रुपयांचे दोन स्टॅम्प पेपर आणले. हे खरे नाही की, येतानाच तो त्यावर मजकुर टाईप करुन आला होता. हे खरे नाही की, मुंबईला जायची गडबड असल्याने मदनला किंवा त्याच्या भावाला आणि आईला मजकूर वाचून न दाखवताच त्यांच्या त्यावर सहया घेतल्या. हे खरे नाही की, मजकूर वाचून दाखवण्याची विनंती केली असता मी बरोबर लिहिले आहे, मी वकिलच आहे, तुम्हाला त्यातले काय कळते असे मंगेश म्हणाला. हे खरे नाही की, मी याचा दुरुपयोग करणार नाही असे तो म्हणाला. हे खरे नाही की, घाई करुन त्याने दस्तावर सहया घेतल्या. हे खरे नाही की, उशीर झाल्याने मी माझया गाडीने तुम्हाला गावी नेवून सोडतो असे मनोज म्हणाला. रात्री मुक्काम करुन सकाळी जावू असे तो म्हणाला, यास

नियमीत दिवाणी दावा क्र.०७/२०१९
अनुसया वि. शासन व इतर
वादीतर्फे सा.क्र.६
(नि.क्र.९४)

**//१४//**

माझे सांगणे की, रात्री मी मुक्काम केला. हे खरे की, त्या दिवशी मी, बाजीराव, जनाबाई मुक्कामी त्यांच्याकडे थांबलो. हे खरे नाही की, मुक्कामाच्या दिवशी दोन्ही स्टॅम्प पेपर मनोजकडेच होते. हे खरे नाही की, दुस-या दिवशी जनाबाईला दस्त देतो असे तो म्हणाला. हे खरे नाही की, दुस-या दिवशी मी, जनाबाई, बाजीराव मनोजच्या कारने गावी आलो.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

**स्वाक्षरीत/-**
(एस.एन.सरडे)

दिनांक ११/०६/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.

.